# प्रेस नोट दि. ११/०५/२०२२

## दिवसा ढवळया भर चौकात फायरिंग करुन खुन करणाऱ्या व सहा महिन्यापासुन फरार असलेल्या मोका गुन्हयातील ०२ पाहिजे आरोपीस गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, दिनांक- १८/१२/२०२१ रोजी दत्त जयंतीचे कार्यक्रमा दरम्यान सांगवी पोलीस ठाणे हद्दित काटे पुरम चौकात मुख्य आरोपी गणेश मोटे याने त्याचे साथिदारांसह मिळुन भर दिवसा फायरिंग करुन मयत नामे योगेश जगताप याचा खुन केला असल्याने सांगवी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-५५०/२०२१ भा.दं.वि.कलम-३०२ व आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयातील आरोपी हे कुख्यात असुन ते संघटीत रित्या गुन्हेगारी कृत्य करुन परिसरात दहशत पसरवुन अर्थाजन करत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात मोका कायदा लावुन कलम वाढ केल्याने दाखल गुन्हयाचा तपास श्री डिसले,सहायक पोलीस आयुक्त, वाकड विभाग हे करत आहेत. सदर गुन्हयातील टोळीचे सदस्य इतर पाहिजे आरोपी गुन्हा झाले पासुन अद्याप फरार असल्याने व सदरचे आरोपी त्याच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता असल्याने पाहिजे आरोपींना लवकरात जवकर अटक करणे बाबत **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. अंकुश शिंदे** यांनी गुन्हे शाखेस आदेशित केलेले आहे.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मच्छिंद्र पंडीत, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, पोलीस उपनिरीक्षक, गणेश रायकर आणि पोलीस अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.

त्यावेळी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड **पोलीस अंमलदार पोशि/१८७२ चव्हाण, पोशि/२२९३ शिंदे, पोशि/२७२० गावंडे** हे दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी बाबत माहिती काढत असताना त्यांना, सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी बबलु नायर व निखील गाडुते यांचेसंदर्भात गोपणीय माहिती मिळाली. सदर माहिती चे **पोशि/२१०२ सैद** यांनी बारकाईने तांत्रिक विश्लेषण केले असता सदर आरोपी हे पनवेल, नवी मुंबई परिसरात लपुन बसले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार **पोलीस उपनिरीक्षक, गणेश रायकर, पोहवा/९१६ शेटे, , पोशि/१८७२ चव्हाण, पोशि/२२९३ शिंदे, पोशि/२७२० गावंडे** यांचे एक पथक तयार करुन त्यांना पाहिजे आरोपींचा शोध घेणे कामी पनवेल येथे रवाना केले होते. सदर पथकाने नमुद आरोपींचा पनवेल ग्रामीण पोलीस ठाणे च्या हद्दित कसोशीने शोध घेतला असता **आरोपी नामे राजन ऊर्फ बबलु रवी नायर, रा- जुनी सांगवी, पुणे व आरोपी नामे निखील ऊर्फ डोक्या अशोक गाडुते, रा- जुनी सांगवी, पुणे** हे तेथिल कोनगाव परिसरात असलेल्या एका उंच इमारतीचे २० व्या मजल्यावर एका फ्लॅट मध्ये राहत असले बाबत माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक पोलीसांचे मदतीने दिनांक-०९/०५/२०२२ रोजी पहाटे दरम्यान सदर ठिकाणी जावुन त्यांचा शोध घेतला असता सदरचे आरोपी हे त्यांच्या २० मजल्यावरील फ्लॅट मध्ये असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा सदर स्टाफने दरवाजा ठोठावुन आरोपींना दारवाजा उघडण्यास सांगितले असता सदर आरोपींनी दार न उघडता ते फ्लॅट मधील गॅलेरी जवळील ड्रेनेज पाईपने खाली उतरुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. सदर बाब लक्षात येताच वर नमुद पथकाने त्यांचा जिव धोक्यात घालुन सदर आरोपींना ते ड्रेनेज पाईप वरुन उतरत असताना १८ व्या मजल्या वरुन ताब्यात घेतले.

सदर आरोपींना पुढील कारवाई कामी सहायक पोलीस आयुक्त, वाकड विभाग यांचे ताब्यात देण्यात आहे.

-----------------------------------ooo-----------------------------------

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. अंकुश शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे डॉ. काकासाहेब डोळे सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक, सिद्धनाथ बाबर, पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, संजय गवारे, पोहवा/ प्रविण दळे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, संतोष असवले, पोना/मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, आदिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे व तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

(डॉ. काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय
पिंपरी चिंचवड